International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा विकास

**प्रा. काटे अजय दगडू [1], डॉ. कोकरे साधू हणमंत [2]**
[1]सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग , आदर्श कॉलेज विटा,ता.खानापूर जि.सांगली
[2]सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, बळवंत कॉलेज विटा, ता.खानापूर जि.सांगली

**प्रस्तावना:**

२० व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या कर्जबाजारी परिस्थितीची जाणीव ब्रिटिश सरकारला होती. ज्या ठिकाणी सरकार व खाजगी क्षेत्राकडून वस्तू व सेवा पुरविण्यामध्ये कमतरता येते त्या ठिकाणी सहकार योग्य पर्याय ठरतो. १९०४ मध्ये सहकारी पतपुरवठा पतसंस्था कायदा अस्तित्वात आला. १९१२ मध्ये सहकारी संस्था कायदा तयार करण्यात आला. सहकारी संस्थांचा विकास व समन्वय यांचा अभ्यास करण्यासाठी आर. जी. सरैया समितीची १९४५ ला स्थापना करण्यात आली. या समितीला सहकार नियोजन समिती असेही म्हणतात. १९५१ मध्ये ए. डी. गोरवला समितीची स्थापना करण्यात आली. या कायद्यामुळे सहकारी संस्था स्थापन होऊ लागल्या. १९१२ च्या दुसऱ्या सहकारी कायद्यामुळे शेतकरी व बिगर शेतकरी संस्था हे वर्गीकरण रद्द करण्यात आले. भारतात स्वातंत्र्यानंतर देशातील साधनसामग्रीचा महत्तम उपयोग करून घेण्यासाठी पंचवार्षिक योजनेला प्राधान्य दिले. नियोजन आयोगाने सहकार क्षेत्रास मदतीचा हात दिला. भारतात सहकारी चळवळ सुरु करण्याचे श्रेय धनंजय गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, वि.म.दांडेकर यांना जाते. सहकाराच्या माध्यमातून दुर्बल घटकातील व्यक्तींनी एकत्र येऊन आपल्या आर्थिक हिताचे रक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न केला. ना नफा ना तोटा व लोकशाही पद्धतीने कारभार या तत्वानुसार चालणाऱ्या सहकार चळवळीमध्ये विकास करण्याची ताकद आहे.

**महाराष्ट्रातील सहकाराचा विस्तार:**

महाराष्ट्रात सहकारी चळवळीची सुरुवात १९१० मध्ये प्राथमिक कृषी पतसंस्थेच्या स्थापनेणी झाली. महाराष्ट्रात १९५० मध्ये प्रवरानगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना उभारला गेला. हा भारतातीलच नव्हे तर आशियातील पहिला सहकारी कारखाना होता. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा करण्यात आला. याला अनुसरून १९६१ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था नियम लागू करण्यात आले. ९७ व्या घटना दुरुस्ती ला अनुसरून महाराष्ट्र सहकारी कायद्यात बदल करून महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था दुरुस्ती कायदा २०१३ करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष म्हणून साजरे केले. यावेळी सहकारातून समृद्धीकडे हा नारा देण्यात आला. महाराष्ट्रात स्व. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, राजारामबापू पाटील, तात्यासाहेब कोरे, विठ्ठलराव विखे-पाटील, शंकरराव मोहिते-पाटील, श्री शरदचंद्रजी पवार इ. सहकार महर्षींनी सहकार चळवळीला चालना दिली. त्यामुळे आज महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने, बँका, शेतमाल खरेदी-विक्री संस्था, मजूर संस्था, सूत गिरण्या, कुक्कुटपालन संस्था, फळबाजार संस्था, इत्यादी सहकारी संस्थांचे जाळे पसरल्याचे दिसते.

**अभ्यासाचे महत्त्व:** सहकारामुळे समाजातील सर्व स्तरातील व्यक्तीचे एकत्रीकरण होऊ लागते. सभासद व समाजाचे कल्याण यासाठी प्राधान्य दिले जाते. सहकार संस्थांची कार्यप्रणाली पूर्णपणे लोकशाही तत्वावर आधारित असल्याने समाजातील वंचित घटकांचा समावेश होतो. आज ही भारतातील जवळपास ६५ टक्के लोकसंख्या खेड्यात राहते, या लोकांचा उदरनिर्वाह पूर्णपणे प्राथमिक क्षेत्रावर आहे. या क्षेत्राला पतपुरवठा

पुरवण्याचे काम सहकारी संस्थांनी केले आहे. सरकारच्या नियंत्रणाखाली सहकारी संस्था सक्षम झाल्या. परंतु अलीकडील काही वर्षात बऱ्याच सहकारी संस्था चुकीच्या व्यवस्थापन पद्धतीमुळे कमकुवत बनल्या आहेत. या संस्थांना सदृढ बनविण्यासाठी या संस्था खाजगी व्यक्तीकडे हस्तांतरीत होत आहेत. हे लक्षण सहकाराला विनाशाकडे घेऊन जात आहे.

**अभ्यासाची पद्धती:** सदरचा शोधनिबंध पूर्णत: दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित असून यासाठी वेगवेगळे वार्षिक अहवाल, विविध लेख, नियतकालिके, मासिके, दैनिक वर्तमानपत्रे, इंटरनेट व संदर्भ पुस्तकांचा आधार घेतला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

१. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

**विश्लेषण:** महाराष्ट्र हे एक देशातील प्रगतशील राज्य आहे. महाराष्ट्रातील सहकार चळवळ देशात अग्रेसर आहे. सुरुवातीला शेतीसाठी पतपुरवठा एवढे मर्यादित धोरण होते. परंतु आज ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग, ग्राहक भांडारे, शेतमाल खरेदी विक्री संघ इत्यादीने चांगले स्थान प्राप्त केले आहे. सहकारी चळवळीने राज्यातील सामान्य माणसाचे जीवनमान उंचावण्यास मदत केली.

**महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या**

| अ.नं. | सहकारी संस्था | २०१६ |
|---|---|---|
| १. | शिखर संस्था | ३५ |
| २. | प्राथमिक कृषी पतसंस्था | २१०६२ |
| ३. | बिगर कृषी पतसंस्था | २२,३३६ |
| ४. | पणन संस्था | १,५१८ |
| ५. | शेतीमाल प्रक्रिया उपक्रम संस्था | ३९.७८१ |
| ६. | इतर सहकारी संस्था | १,४०.९९७ |

राज्यात गृहनिर्माण संस्था, साखर कारखाने, सूतगिरण्या, डेअरी, मल्टिस्टेट सहकारी बँका व हातमाग, यंत्रमाग, पणन अशा अन्य सहकारी संस्था अशा मिळून एकूण दोन लाख ३८ हजार संस्था आहेत. महाराष्ट्रात २०० पेक्षा जास्त सहकारी साखर कारखाने आहेत, राज्यात ३१ हजार सहकारी डेअऱ्या असून १०६ सहकारी दूध संघ आहेत. ग्रामीण भागात सहकारी संस्थांच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिवर्तनाचे काम झाले आहे. अलीकडील काही वर्षात अनेक संस्था अयोग्य व्यवस्थापनामुळे बंद पडल्या आहेत. त्यामुळे सभासद अडचणीत आले आहेत.

**सहकारी चळवळी समोरील आव्हाने:**

**१. सहकारातील राजकारण-** सध्या बऱ्याच सहकारी संस्थेत सभासदांच्या हिताचा,
हक्काचा विचार होत नाही. राज्यकर्ते व्यक्तिगत हितासाठी संस्थेचा वापर करतात.

**२. सहकारी संस्था चालविण्यात अडथळा-** महाराष्ट्र सहकार कायदा १९६० नुसार सर्व सहकारी संस्था चालविल्या जातात. एकाच सहकारी कायद्याखाली सर्व संस्था चालवणे अवघड आहे.

**३. खेळते भांडवल-** सहकारी संस्थाना उत्पादन खर्च भागविणे बाजारपेठेतील नवीन बदल स्वीकारणे, वस्तूची गुणवत्ता सुधारणे, इत्यादी साठी सहकारी संस्थेला खेळत्या भांडवलाची कमतरता भासते.

**४. स्पर्धेचे आव्हान-** जागतिकीकरणामुळे अंतर्गत स्पर्धेत तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत बहुराष्ट्रीय कंपन्या बरोबर स्पर्धा करावी लागते, बहुराष्ट्रीय वस्तू तुलनेने उच्च असतात.

**५. व्यवस्थापन समस्येचे आव्हान-** खाजगी क्षेत्रात उद्योग व्यवसायाचे व्यवस्थापन करण्यासाठी तज्ञ कुशल प्रशिक्षित व्यक्तींची निवड केली जाते. अशा व्यक्तीना

मोबदला जास्त दिला जातो. परंतु सहकारी संस्थेला हे परवडत नाही.

**६. तंत्रज्ञान सुधारणेचे आव्हान-** सहकारी संस्थामध्ये श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर केला जातो. परंतु सध्याच्या परिस्थितीत श्रमाच्या जोडीला आधुनिक तंत्रज्ञान वापरणे गरजेचे आहे.

**७.बाजारपेठे विषयक संशोधन वाढविण्याचे आव्हान-** सध्याच्या परिस्थितीत सहकारी संस्थांनी आपली वस्तू फक्त स्थानिक बाजारपेठ मर्यादित न धरता आपल्या वस्तूला विदेशात मागणी निर्माण झाली पाहिजे, त्यादृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**८. कर्जाच्या वसुलीचा प्रश्न-** सहकारी संस्थाच्या संचालकानी कर्जाचे वाटप नातेवाईक, मित्रमंडळी यांना केले असल्यामुळे अशी कर्जे वेळेत आलेली नाहीत त्यामुळे संस्थांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे.

**महाराष्ट्रातील सहकारी संस्था भक्कम करण्यासाठी काही उपाययोजना करणे गरजेचे आहे-** १.सहकारी संस्थेच्या सभासदांनी कार्यकुशल व स्वच्छ प्रतिमा असणाऱ्या व्यक्तींना संचालक म्हणून नेमणूक करावी.२.सहकारी संस्था बळकट करण्यासाठी कार्यक्षम संशोधनवृत्ती जोपासणारा संगणकाचे ज्ञान असणारा व्यवस्थापक व कर्मचारी वर्ग असावेत.३.खाजगी संस्थेशी स्पर्धा करण्यासाठी बाजारपेठेचा अभ्यास करून कार्यक्षम यंत्रणा उभी करावी. ४.सहकारी क्षेत्र राजकारणापासून अलिप्त असले पाहिजे. ५.नाबार्ड व रिझर्व्ह बँकेने कमकुवत सहकारी संस्था विलीनीकरण कराव्यात. ६.सहकारी संस्थांनी पारदर्शक स्वरूपाचा कारभार करण्यासाठी अंकेक्षण वेळोवेळी करावे. ७.सहकारी संस्थेला मिळणारे अनुदान वेळेत मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. ८.सहकाराची वितरण व्यवस्था प्रभावी असावी.९. महिलांचा सहकारातील सहभाग वाढवणे गरजेचे आहे. १०.सहकारातून रोजगार प्राप्ती चे ध्येय ठेवावे. ११.साखर उद्योगातील उपपदार्थांना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. १२.सर्व सहकारी संस्थांचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने व्हावे.१३.प्रत्येक जिल्ह्यासाठी सहकाराचे मुख्य कार्यालय असावे.१४.प्रक्रिया उद्योगांना खात्रीशीर बाजारपेठ मिळावी.१५.पतसंस्थेतील ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षिततेसाठी प्रयत्न करावेत.

**समारोप:**

ग्रामीण भागात सहकाराच्या वेगवेगळया शाखामुळे लोकांना रोजगार मिळाल्यामुळे सहकार हे अर्थव्यवस्थेचा कणा बनला आहे. देशातील सहकार चळवळीने २०१२ ला शताब्दी वर्ष पूर्ण केले असले तरी आज सध्या सहकारी संस्थेला खाजगी क्षेत्राबरोबर स्पर्धा करावी लागत आहे. यासाठी सहकाराला पारदर्शकता व प्रामाणिक कारभार करणे गरजेचे आहे. ९७ व्या घटनादुरुस्तीने सहकारी क्षेत्राला बळकटी प्राप्त झाली आहे. सहकाराची विश्वासहर्तता वाढविण्यासाठी सरकारचे सहकार्य महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील शेती क्षेत्रावर आधारित प्रक्रिया उद्योगांच्या वाढीसाठी प्रयत्न अपेक्षित आहेत.

**संदर्भ:**

१. प्रा.डॉ.जुगळे व्ही.बी. 'सहकारी तत्वे आणि व्यवहार' प्रकाशक डी. व्ही. मुळे
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

२. प्रा. डॉ.जुगळे व्ही.बी. डॉ. जुगळे वाय.व्ही. 'महाराष्ट्रातील सहकारी चळवळ दिशा
व दशा.'

३. मासिके सहकारी महाराष्ट्र विविध अंक.

४. प्रा. डॉ. रविंद्र पुंडलिक पाटील 'महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचा विकास व
विस्तार'Mukt Shabd Journal, ISSN NO : 2347-3150.